बुधवार, दि ५ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक १८ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## इकरा मन्सूर अपहरणप्रकरणी सीआयडी चौकशीची मागणी

### सामाजिक कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाचे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड शहरातून १२ जानेवारी रोजी अपहरण झालेल्या इकरा अमजद मन्सूर (वय ३ वर्षे) हीचा शोध २३ दिवसानंतरही पोलिसांना लावता आलेला नाही. त्यामुळे सर्वत्र संतप्त वातावरण असून, या प्रकरणाची सीआयडी चौकशी करून शोध लावण्यात यावा; अन्यथा शहरातील नागरिकांच्यावतीने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने सोमवार दि. ३ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवले. त्यात म्हटले आहे की, चिमुकलीच्या अपहरणाला २३ दिवस उलटूनदेखील शोध लागलेला नाही. पोलिसांनी योग्यवेळी तपासाची गती न वाढवल्याने संपूर्ण समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अपहरणानंतर सुरुवातीचे २४ तास म हत्वाचे असतात. मात्र, पोलिस यंत्रणेकडून तशी तात्परता दाखवण्यात आलेली नाही. परिवाराने वारंवार विचारूनही तपासाची माहिती दिली जात नाही, ही गंभीर बाब आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कडक उपाययोजना होणे गरजेचे आहे. मुली व महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अपहरण करणाऱ्या टोळीचा छडा लावून कठोर कारवाई करावी. यात गुन्हेगार टोळी किंवा मानवी तस्करीचा काही संबंध आहे का, याचा सखोल तपास होणेही गरजेचे आहे. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी अपहरणानंतर तातडीने कारवाई का केली नाही, याची चौकशी करावी, मुलीच्या परिवाराला सुरक्षा पुरविण्यात येऊन न्याय द्यावा, मुली-महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस पथक स्थापन पान ३ वर

## स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांचा तात्काळ शासन सेवेत समावेश करा

### बाबासाहेब कोलते यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या वारस मुला मुलींना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्तीवेतन मंजूर करून नामनिर्देशित पाल्यांना शासन सेवेत १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे समावेश करून घेण्याची मागणी स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना तसेच त्यांच्या मुलामुलींना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्तीवेतन मंजूर करावे कारण भारत देशातील हरियाणा सरकारने राज्यातील मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारस मुलाम ुलींना दि. १५ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून निवृत्तीवेतन सुरु केले आहे त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलामुलींना निवृत्तीवेतन मंजूर करावे. केंद्र व राज्यशासनाने स्वातंत्र्य सैनिक मयत झाल्यानंतर त्यांना मिळणारे निवृत्तीवेतन शासनाकडून नियमानुसार बंद होते परंतु मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची नव्या पिढीला आठवण राहावी व थोर स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास हा त्यांच्या वारस मुला मुलींना कळावात्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसांना निवृत्तीवेतन वारसाने मंजूर करावे. तसेच महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य गेल्या अनेक दिवसापासून शासनाने नोकर भरतीचा शासन निर्णयच पान ३ वर

## युवा आदर्श कागदी पाहुणे ...

घरी माझ्या येणारे
लांबडी चौडी यादी
सरता सरेना वर्दळ
सारखी दाटते गर्दी
फ्लिपकार्ट अमेझॉन
कुणीही येतात कधी
दूधवाला पेपरवाला
हजेरी लावतो आधी
घेऊन जाई भरभरू
भंगार पेपर अन् रद्दी
हटकून भेटाया येती
फेरीवाले अतिजिद्दी
रोज हेलपाटे मारती
स्विगी झोमॅटो आदि
स्कीम काढू नवनवी
सतत लावतात नादी
ऑनलाईन शॉपींगचे
ओळखीचे रे अगदी
आगंतुक भाव शून्य
व्यवहार असे कागदी
झाडूवाले कामवाली
रोजची ठरलेली वर्दी
माहीत नाही रे परंतु
पै पाहुणे आले कधी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## खरपुडी येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयातंर्गत कार्यरत असलेल्या नेहरू युवा केंद्राच्यावतीने खरपुडी येथील पार्थ सैनिकी शाळेत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धे चे आयोजन दि.३ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या खेळाडूंनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला, अशी माहिती नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पान ३ वर

## आपल्या मुलीबद्दल आपण सजग असले पाहिजे - शिक्षणाधिकारी मंगल धूपे



**जालना । दत्ता देशमुख -** येथील हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयामध्ये एक अनोखा उपक्रम राबविला आहे. हळदी कुंकू निमित्त महिला पालकांचा पालक मेळावा घेऊन त्यांच्यामध्ये विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रथमतः माननीय शिक्षणाधिकारी जि.प.मंगल धुपे मॅडम यांनी सा वित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले व तदनंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. मीनाक्षी कुलकर्णी यांनी माननीय शिक्षणाधिकारी यांचे स्वागत केले. उखाणे घेणे ,डोळे बंद करून चेंडूला काठी मारणे तळ्यात मळ्यात, संगीत खुर्ची अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा मूळ उद्देश म्हणजे पालकांमध्ये विद्यार्थ्यांविषयी सजगता निर्माण व्हावी तसेच आपल्या मुलांमध्ये असणारी क्षमता ओळखून त्यांना तशी सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे हे होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पालक शिक्षक यांच्यातील बंध घट्ट व्हावेत तसेच शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचा संपर्क सतत राहिला तर विद्यार्थी अभ्यास केंद्रित होईल.

## भाजपा सदस्य नोंदणी अभियानांतर्गत जालना राज्यात पाचवा क्रमांक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांचे अभिनंदन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यात भाजप पक्षाच्या सदस्यता नोंदणी अभियान सुरु आहे, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशच्यावतीने राष्ट्रीय सदस्यता अभियान अंतर्गत महाराष्ट्र प्रदेश कार्यशाळा श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृह, मुंबई येथे (दि.०४) आयोजित करण्यात आली होती. यामध्ये भाजपा सदस्य नोंदणी अभियाना अंतर्गत जालना जिल्ह्याचा राज्यामध्ये पाचवा क्रमांक आला असून, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी जालना भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांनी सांगितले कि, भाजपा नेते तथा माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही जालना जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीच्या संघटनपर्व अभियानात सक्रिय सहभागी होत पक्षाच्या सदस्यता संख्या वाढीसाठी प्रयत्न करीत आहोत, पुढेही सदस्यता नोंदणी अभियानात जालना जिल्ह्याचा सक्रीय सहभाग राहील असा विश्वास श्री.पठाडे यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष ना.चंद्रशेखर बावनकुळे, पान ३ वर



# संपादकीय

## व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेऊन ३० दिवसही उलटले नाहीत तोवर धडाकेबाज निर्णय घेऊन जगाला हादरवून सोडले आहे. राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतच त्यांनी अमेरिका फर्स्ट ही घोषणा केली होती. अमेरिकेच्या हितासाठी जे काही करता येईल ते मी करेल त्यासाठी जगाशी लढावे लागले तरी बेहत्तर अशी घोषणा त्यांनी निवडणूकी दरम्यान केली होती त्यांच्या याच घोषणेमुळे ते निवडून आले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताच त्यांनी त्या दिशेने पावले टाकली आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडा या देशातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के तर चीन मधून आयात होणाऱ्या वस्तूंवर १० टक्के अतिरिक्त कर लावला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे मेक्सिको , कॅनडा आणि चीन या देशांनाच नाही तर जगाला ही हादरा बसला आहे . कारण त्यांच्या या निर्णयामुळे आता जगात व्यापार युद्ध सुरू होईल अशी चिंता जाणकारांनी व्यक्त केली आहे. अमेरिकेने या तिन्ही देशांवर लावलेल्या अतिरिक्त करांना या तिन्ही देशांनीही जशास तसे उत्तर दिले आहे. मेक्सिकोच्या राष्ट्रपती क्लाडिया शिणबन यांनी आपल्या अर्थमंत्र्यांना देशहितासाठी अमेरिकन वस्तूंवर अतिरिक्त कर लावण्यास सांगितले आहे. कॅनडाने अमेरिकेचा निषेध व्यक्त करत अमेरिकन वस्तूंवर तितकाच म्हणजे २५ टक्के अतिरिक्त कर लावण्यात येईल असा इशारा दिला आहे. चीनही जागतिक व्यापार संघटनेमध्ये ट्रम्प यांना आव्हान देऊन प्रतीकात्मक पाऊल उचलण्याची शक्यता आहे. जगातील या चार मोठ्या देशात एक प्रकारे हे व्यापार युद्धच सुरू झाले आहे त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो परिणाम महागाई मोठ्या प्रमाणात वाढू शकते. ट्रम्प यांच्या या निर्णयाने जगातील सर्वच मोठ्या देशांचे धाबे दणाणले आहे. ट्रम्प यांची वक्रदृष्टी केंव्हाही आपल्यावर पडू शकते अशी भीती अनेक देशांना वाटू लागली आहे. भारताने याबाबत जाहीरपणे चिंता व्यक्त केली नसली तरी भारतातही या निर्णयाचे सावट पसरले आहे. भारताने या निर्णयावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही मात्र भारत सावध पावले टाकत आहे हे नक्की. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुढील महिन्यात अमेरिकेचा दौरा करण्याची शक्यता आहे. त्यावेळी चर्चेत हा मुद्दा येऊ शकतो मात्र सध्या तरी भारताने सावध राहायला हवे. ट्रम्प कधी कोणता निर्णय घेतील याचा नेम नाही. आधीच त्यांच्या एका निर्णयाने अमेरिकेतील भारतीयांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. ट्रम्प अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरितांना बाहेर काढण्याच्या तयारीत आहेत. अमेरिकेत कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांना बेकायदेशीर स्थलांतरित म्हणून संबोधले जाते. प्यू रिसर्च च्या अहवालानुसार अमेरिकेत ७. २५ लक्ष बेकायदेशीर भारतीय स्थलांतरित राहतात या बाबतीत भारत मेक्सिको आणि साल्वाडोर नंतर तिसऱ्या स्थानावर आहे. एका वृत्तानुसार अमेरिकन प्रशासनाने अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहत असलेल्या भारतीयांना भारतात परत पाठवण्यासाठी एक योजना आखली असून त्यासाठी त्यांनी एक खास लष्करी विमान तयार ठेवले आहे. राष्ट्राध्यक्षपदी आरूढ झाल्यानंतर ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे जगात व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता आहे त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होणार आहे त्यामुळे जगभर खळबळ माजली आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# श्री सिद्धिविनायक मंदिरातील वस्त्रसंहिता योग्यच!

## पंतप्रधानही वस्त्रसंहितेचे पालन करतात; सरकारीकरण झालेल्या सर्वच मंदिरात वस्त्रसांहिता लागू करा; महाराष्ट्र मंदिर महासंघ

**मुंबई -** श्री सिद्धिविनायक मंदिर प्रशासनाने लागू केलेल्या वस्त्रसंहितेच्या निर्णयाचे महाराष्ट्र मंदिर महासंघ स्वागत करत त्याला पूर्ण पाठींबा देत आहे.



मंदिर हे पवित्र धार्मिकस्थळ आहे. ते आपल्या संस्कृती आणि परंपरांचे केंद्रस्थानही आहेत. त्यामुळे तेथे योग्य पोषकाचे पालन होणे आवश्यक आहे. मंदिर व्यवस्थापनाने घेतलेल्या या निर्णयामुळे मंदिरातील वातावरण अधिक पवित्र आणि शिस्तबद्ध राहील, असे मत महासंघाने व्यक्त केले आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आदर्श :** देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी हे स्वतःच्या (एस्.पी.जी.) सुरक्षारक्षकांसह गुरुवायूर मंदिर, तसेच गुरुद्वारामध्ये दर्शनासाठी जातांना तेथील वस्त्रसंहितेचे पालन करून जातात. जेव्हा देशाच्या सर्वोच्च नेत्याने असा आदर्श घालून दिला आहे, तेव्हा सर्वसामान्य भाविकांसाठी मंदिर प्रशासनाने घालून दिलेल्या वस्त्रसंहितेचे पालन करण्यात कोणतीही अडचण असता कामा नये. तसेच श्री सिद्धिविनायक मंदिराने घेतलेल्या या निर्णयाचा आदर्श इतर सरकारीकरण झालेल्या सर्वच मंदिरांनी घ्यावा, असेही महासंघाने म्हटले आहे.

**केवळ हिंदू मंदिरांवरच आक्षेप का? :** 'विद्येच्या मंदिरा'मध्ये (शाळेत) ड्रेसकोड चालतो, 'न्यायाच्या (न्यायालय) मंदिरा'त ड्रेसकोड चालतो, तसेच 'लोकशाहीच्या मंदिरा'तही (विधान भवन) येथे ड्रेसकोड चालतो, तर मग केवळ मंदिरातील ड्रेसकोडवर आक्षेप का ? असा सवाल करत मंदिर महासंघाने पुढे स्पष्ट केले आहे की, मंदिरातील वस्त्रसंहिता ही केवळ महिलांना लागू करण्यात आलेली नसून ती सर्वांसाठीच लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे हा 'महिलांवर अन्याय' असल्याचे म्हणणे हा खोटा प्रचार आहे. उज्जैनचे श्री महाकालेश्वर मंदिर, श्री काशी विश्वेश्वर मंदिर, श्री तिरुपती बालाजी मंदिर यांसह देशभरातील अनेक मंदिरांमध्ये भाविकांसाठी वस्त्रसंहिता लागू केलेली आहे. इतकेच नव्हे, तर चर्च, मशिदी, गुरुद्वारा यांसह पोलीस ठाणे, रुग्णालये, सरकारी कार्यालये अशा अनेक ठिकाणी विशिष्ट प्रकारचे पोशाख बंधनकारक आहेत; मात्र केवळ हिंदू मंदिरांमध्ये अशा नियमांवर आक्षेप घेतला जातो, हे खेदजनक आहे.

**संस्कृतीचे संरक्षण गरजेचे :** मंदिरात जाणार्या भाविकांनी योग्य वस्त्र धारण करावे, यासाठी मंदिर प्रशासनाने केलेले आवाहन योग्यच आहे. मंदिर हे श्रद्धास्थान असून, तेथे जाणार्या प्रत्येकाने भाविक वृत्तीने आणि भक्तिभावाने जाणे आवश्यक आहे. त्यामुळे वस्त्रसंहितेचा नियम हा भक्तांच्या सन्मानासाठी असून व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधन नाही.

# कुठलेही दडपण न टाकता मुलांना हसत खेळत शिकू द्या - डीवायएसपी विशाल खांबे

## महात्मा फुले इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**अंबड । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्नेह संमेलनासारखे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम उपयुक्त ठरतात.तसेच पुस्तकी अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला,छंद जोपासावेत असे आवाहन करतांनाच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कौतुकास्पद काम महात्मा फुले इंग्लिश स्कुल नेहमीच करत असते.पालकांनी दडपण न आणता मुलांना हसत खेळत शिकू द्यावे असे मत अंबडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांनी व्यक्त केले.




अंबड शहरातील महात्मा फुले व स्मार्ट किडस वर्ड इंग्लिश स्कुलच्या शनिवारी (ता.१) आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून एसबीआय बँकेचे शाखाधिकारी कैशीक चौधरी,माजी उपनगराध्यक्ष केदार कुलकर्णी,भाजपा जेष्ठ नेते डॉ. राजेंद्र ठोसर, चंद्रशेखर मोहरीर,माजी नगरसेवक कुमार रुपवते,नगरसेवक सौरभ कुलकर्णी,पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे,हरीश्चंद्र सोळुंके,केंद्र प्रमुख माने सर ,बाजार समिती संचालक केदार राठी,श्रीमंत खरात,सुहास सोडाणी,अजीज बेग आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे म्हणाले की, कोणत्याही मुलाची पहिली शाळा हे त्याचे घर असते आणि पहिले शिक्षक हे त्याचे पालक असतात. सुरुवातीच्या काळात कोणतेही मूल आपल्या पालकांकडूनच सर्व कामे करायला शिकते, जर तुम्हाला तुमच्या मुलाचे भविष्य चांगले घडवायचे असेल तर त्यांना नेहमीच चांगले शिक्षण द्या.आजच्या पालकामध्ये शिक्षणाविषयी आवड आहे त्यामुळे प्रत्येक पालक आपल्या मुलांकडून काही तरी आपेक्षा धरुन आहे मात्र पालकांनी आपल्या मुलांवर जास्त दडपण न टाकता त्यांला मुक्त पणे त्यांच्या मनाप्रामाणे जगू दिले पाहिजे,हे वय मुलांचे खेळण्या बागडण्याचे आहे त्यामुळे मुलांना हसत खेळत शिकू द्या असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी भारतीय स्टेट बँकेचे शाखाधिकारी कैशिक चौधरी व भाजपाचे जेष्ठ नेते डॉ.राजेंद्र ठोसर यांनीही मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात संस्थाध्यक्ष गिताराम मते यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला तसेच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे काम आम्ही असेच प्रामाणिकपणे करत राहू अशी ग्वाही दिली. यावेळी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात देवा श्री गणेशा,सोशल मिडिया नाटक,फनी डान्स, देशभक्तीपर गाणे,खंडेराया झाली माझी दैना अशी अनेक गाणे विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे सादर केली.यामध्ये शिवराज्याभिषेक तसेच देशाच्या एकात्मतेवरील नृत्यकला लक्षवेधी ठरल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या सविता मते, आश्विनी जाधव, शिला जाधव, आश्विनी जानवे, शबनम शेख,साधना शिंदे,गायत्री पाटील,कोमल देवडे, अहिल्या सावजी, वैष्णवी गायकवाड,वैभवी पडूळ यांच्यासह बाबासाहेब जावळे,शिवराज मते,दिपक कोरडे,सागर परदेशी,सुरज राऊत, श्रेयस धांडे, हंसराज मते, संजय परदेशी आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह विद्यार्थी व पालकांची मोठी उपस्थिती होती.

**हलाखीच्या आर्थिक परिस्थितीच्या मुलांना मोफत शिक्षण**

कोरोनामध्ये पालक गमावलेल्या मुलांसह आत्महत्याग्रस्त शेतक-यांची मुले तसेच जे पालक मुलांची शैक्षणिक फिस भरु शकत नाही अशा गरीब मुलांना महात्मा फुले इंग्लिश स्कुलमध्ये मोफत प्रवेश देवून त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च संस्था करत असून सद्यस्थितीमध्ये या शाळेत अशी १७ मुले मोफत शिक्षण घेत आहेत असे संस्थाध्यक्ष गीताराम मते यांनी यावेळी सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये रथसप्तमी निमित्त सूर्यनमस्कार प्रशिक्षण उत्साहात



**परतूर । प्रतिनिधी -** रथसप्तमीच्या निमित्ताने सूर्यनमस्काराचे महत्त्व अनन्यसाधारण असून, निरोगी आरोग्य व सकारात्मक ऊर्जेसाठी सूर्यनमस्कार महत्त्वाचे मानले जाते. विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य व आनंद वाढावा, या उद्देशाने विवेकानंद शाळेच्या वतीने विशेष सूर्यनमस्कार प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी योगतज्ञ राधा तांबे व गजानन वायाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थ्यांनी १२ सूर्यनमस्कारांचे शास्त्रीय पद्धतीने प्रशिक्षण घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनानंतर शाळेचे अध्यक्ष संदीप बाहेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग, ध्यान व प्राणायाम महत्त्वाचे आहेत. शाळेत अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भालचंद्र महाजन, विजय धंदाळे, व शिक्षकवृंदांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सकारात्मक ऊर्जा हा कार्यक्रमाचा मुख्य गाभा ठरला.

# कु.साक्षी पाठक रासेयो उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्काराने सन्मानित

**परभणी । प्रतिनिधी -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार सन २०२३-२४ या वर्षीचा परभणी जिल्हास्तरावर कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी ची रासेयो स्वयंसेविका कु. साक्षी रेणुकादासराव पाठक (बी.कॉम. तृतीय वर्ष )यांना डॉ.मनोहर चासकर कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांचे हस्ते शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

कु.साक्षी पाठक यांनी हा सन्मान प्राप्त केल्याबद्दल हेमंतराव जामकर ( अध्यक्ष नूतन विद्यामंदिर शिक्षण संस्था, परभणी) ॲड. किरणराव सुभेदार, (उपाध्यक्ष,नू. वि. म.शि.संस्था) डॉ.अभयराव सुभेदार ( कोषाध्यक्ष,नू.वि.मं.शि.संस्था) विजयसिंह जामकर (सचिव नू.वि.मं.शि.संस्था) डॉ.संजयराव टाकळकर (सहसचिव,नू. वि.मं.शि.संस्था) प्राचार्य डॉ.वसंतराव भोसले,इंजि.नारायणराव चौधरी आदी मान्यवरांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले. तसेच रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.अरुण




पडघन, उपप्राचार्य डॉ.संगीता आवचार, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नसिम बेगम सह सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी साक्षी पाठक यांचे अभिनंदन केले.

प्रसंगी या पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ.सूर्यकांत जोगदंड, प्रा.डॉ.डी.एन. मोरे, इंजि. नारायणराव चौधरी, सदस्य, व्यवस्थापन परिषद स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड. प्र.कुलसचिव डी.डी.पवार , प्रा.डॉ.मल्लिकार्जुन करजगी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, आदींची उपस्थिती होती.

पुरस्काराचा स्विकार करताना कु. साक्षी पाठक यांचे समवेत आई सौ.सुषमा पाठक,परभणी जिल्हा रासेयो समन्वयक प्रा.अरुण पडघन आदींची उपस्थिती होती. मान्यवरांचे शुभेच्छा सह सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.

## पान १ वरुन

### इकरा मन्सुर ...

करावे, आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. ही घटना दुर्लक्षित केल्यास गंभीर परिणाम होणार असून, प्रकरणाची चौकशी त्वरित सीआयडीकडे सोपविण्यात यावी; अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदन दिल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना माजी नगरसेवक शेख शकील लालमिया म्हणाले की, पोलिसांना अद्यापही चिमुकलीचा शोध लावता आलेला नाही. त्यामुळे सर्वत्र संताप आहे. जनतेनेही यात मदत करावी. कुणाला शोध लागल्यास एक लाखाचे बक्षीस शिष्टमंडळाच्यावतीने दिले जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

या निवेदनावर उम्मत बचाव तहेरिकचे हाजी अब्दुल हमीद, माजी नगरसेवक मोहम्मद नजीब, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, सामाजिक कार्यकर्ते संदीप खरात, माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, फारुख तुंडीवाले, सय्यद अजहर, अमजद खान, जयंतराजे भोसले, युवक काँग्रेसचे जालना विधानसभा अध्यक्ष शेख वसीम, फ़कीरा वाघ,अब्दुल खालेक सिद्दिकी, आमेर मिर्झा, शेख अजीम, अशोक सरवडीकर, शादान पठाण, निसार पठान,तौफिक शेख, आतिफ अन्सारी, शेख अज्जू, शेख सलमान यांची नावे आहेत.

### स्वातंत्र्य सैनिकांच्या ...

रद्द केल्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून वंचित आहे. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यावर अन्याय झाला आहे. त्यामुळे नोकरी पासून वंचित असलेल्या नामनिर्देशित पाल्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना शासन सेवेत समावून घेण्यासाठी तात्काळ शासन निर्णय निर्गमित करून नामनिर्देशित पाल्यांना १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासन सेवेत सामावून घेण्यात यावे, अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

### खरपुडी येथे ...

जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी डॉ. राजेंद्र गाडेकर, नेहरू युवा केंद्र जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर व पार्थ सैनिकी शाळेचे प्रा. मोहन नेहरे आदि उपस्थित होते. यावेळी डॉ. गाडेकर व प्रा. नेहरे यांनी खेळाडूंना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी खेळाच्या माध्यमातून शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा विकास कसा साधता येईल, यावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. स्पर्धेमध्ये कबड्डी (पुरुष), खो-खो (महिला), १०० मीटर धावणे (महिला व पुरुष) आणि गोळाफेक (महिला व पुरुष) अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. गोळाफेक महिला गटात कोमल धुमाळ हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर द्वितीय क्रमांक कल्याणी लोखंडे हिने मिळवला. पुरुष गटात अनिकेत उबाळे प्रथम, पावन जावळे द्वितीय आणि आदित्य ढवळे तृतीय स्थानी राहिले. १०० मीटर धावणे महिलांच्या स्पर्धेत अक्षरा भानुसे प्रथम, कोमल धुमाळ द्वितीय, आणि अश्विनी थिटे तृतीय स्थानी राहिली. पुरुष गटात साईराज कोल्हे प्रथम, कृष्णा मैंद द्वितीय, तर धुरंधरे तृतीय क्रमांक मिळवला. खो-खो (महिला) स्पर्धेत दुर्गामाता माध्यमिक विद्यालय, सोयगाव देवी, भोकरदन येथील संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर 'आमची शाळा' या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. कबड्डी स्पर्धेत पार्थ सैनिकी स्कूलच्या संघाने विजेतेपद मिळवले. या स्पर्धेत सहभागी खेळाडूंना ट्रॉफी, मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. खेळाडूंच्या प्रयत्नांना आणि मेहनतीला मान्यता देत प्रमुख पाहुण्यांनी त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक योगेश बावसकर, सत्येंद्र बिश्त, भैय्यासाहेब ढवळे, सतीश गाभूड यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच युवा मंडळाचे अध्यक्ष जयपाल राठोड, अशोक शिंदे, सुरज जाधव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### भाजपा सदस्य ...

कार्यकारी अध्यक्ष रविंद्रजी चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे, सहसंघटन मंत्री आदरणीय शिवप्रकाश जी, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, विधान परिषेदेचे गटनेते प्रवीण दरेकर, सरचिटणीस माधवी नाईक ताई, आ.विक्रांत पाटील, सरचिटणीस राजेश पांडे, सरचिटणीस विजय चौधरी, तसेच सर्व सन्माननीय मंत्री, आमदार आणि प्रदेश सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होते.

यावेळी जालना जिल्ह्यातून जालना महानगर अध्यक्ष सतीष जाधव, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, महानगर महामंत्री सुनील पवार यांची उपस्थिती होती.







॥श्री रेणुकादेवी प्रसन्न ॥





आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होतो की,

# श्री रेणुकादेवी देवी संस्थान

गांधीनगर, जालना



# प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा

दिनांक : 05 फेब्रुवारी ते 07 फेब्रुवारी 2025

योजिला आहे. तरी आपण सहकुटुंब सहपरिवार
उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

## दि -05-02-2025 रोजी बुधवार
## माघ शुक्लपक्ष अष्टमी

स. 07.00 वा. : भव्य शोभा यात्रा प्रारंभ
सकल देवतांना नगर प्रदक्षिणा,
स. 08.00 वा. : रामनगर येथील राम मंदिरात आरती
स. 08.30 वा. : तृप्ती हनुमान मंदिर, रामनगर येथे आरती
स. 09.00 वा. : सुवर्णकार नगर गणपती मंदिरमध्ये आरती.
स. 09.30 वा. : श्री तुळजाभवानी मंदीर येथे आरती
शोभायात्रेचा सांगता रेणुका देवी मंदिर
येथे सांगता होईल.

**प्राणप्रतिष्ठापना पूजा विधी**
**सकाळी 10.0 ते 1.0 पुजा विधी**
गणपती पुजन, पुण्याहवाचन, षोडशमातृका पुजन,
आयुष्यमंत्र, नांदीश्रांद्ध, आचार्यऋत्विगवर्णनम,
भुमीपुजन, अग्नीस्थापन, सकल देवतांना जलाधिवास

दुपारी 01.30 ते 02:00 प्रसादी
दुपारी. 02:00 ते 05:00 पुजा विधी, आरतीने सांगता.
सायं. 06:00 ते 07.00 हरीपाठ



रात्री 8.0 ते 11.00 हरिकीर्तन
वक्ते : ह.भ.प.श्री विष्णु महाराज बारड

## दि 06-02-2025 रोजी गुरूवार
## माघ शुक्लपक्ष नवमी

सकाळी 10.00 ते 01.00 पुजा विधी
वास्तु मंडल स्थापन, योगीनी मंडल स्थापन,
मुख्यदेवता स्थापन, क्षेत्रपाल, भैरव देवता स्थापन,
नवग्रह देवता हवन मुख्यदेवता हवन,
सकल देवतांना धान्यधिवास शय्याधिवास

दुपारी 01.30 ते 02:00 प्रसादी
दुपारी. 02:00 ते 05:00 पुजा विधी
आरतीने सांगता.

रात्री 08:00 ते 12.00 गोंधळ
गोंधळ कथा सादर कर्ते



ह.भ.प.श्री.देवीदास धोंगडे
(शिरडशाहपुरकर जि.हिंगोली)



ह.भ.प.श्री.पृथ्वीराज
देवानंद माळी (जिल्हा सांगली)

ह.भ.प.श्री.बाबासाहेब बेंद्रे
(पांगरीकर जि.बीड)

**प्राणप्रतिष्ठा सोहळा प्रमुख आचार्य**

वे.शा.सं.श्री संजयजी गुरुजी कुलकर्णी
वे.शा.सं.श्री सुनिल महाराज पैठणकर
वे.शा.सं.श्री कृष्णा गुरुजी पैठणकर
वे.शा.सं.श्री शाम गुरुजी कुलकर्णी
वे.शा.सं.श्री विनायक गुरुजी शास्त्री

## दि 07-02-2025 शुक्रवार
## माघ शुक्लपक्ष दशमी:-

**प्राणप्रतिष्ठा पूजा विधी**
**सकाळी 09.00 ते 01.00 पुजा विधी**
स्थापित देवता हवन, देवता न्यास,
देवतांना दशविधी स्नान, सकल देवतांची प्राणप्रतिष्ठा,
स्थापित देवता बलिदान, पुर्णाहुती



**कलश रोहण**
स.11.00 वा.
: शुभहस्ते :
**प.पू.गुरुवर्य भगवान बाबा आनंदगडकर**

दुपारी 01.30 महाआरती
दुपारी 02 ते 06 महाप्रसादी



रात्री 08:00 ते 11.00 हरिकिर्तन
: किर्तनकार :
**ह.भ.प.श्री.काका महाराज खैरे**
(आसोलाकर)
भजनी मंडळ पिंप्री (डुकरे)

Shri Renukadevi Mandir
Jirnodar Sanstha
A/c:- NUKA054000202665
IFSC code :- ICIC0000104
Bank :- ICICI Bank
Branch :- Jalna

-: स्थळ :-
**श्री रेणुकादेवी देवी संस्थान,
गांधीनगर, जालना**

**अधिक माहितीसाठी संपर्क**
**विजय इंगळे**
**9823 38 7231**

**श्री रेणुकादेवी प्राणप्रतिष्ठा व कलशरोहण सोहळ्यानिमित्त येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत व आयोजक व संस्थानच्या पदाधिकाऱ्यांचे मनःपुर्वक अभिनंदन**

स्वागतोत्सुक : विमलबाई श्रीकृष्णराव शेळके व समस्त शेळके परिवार.